विषय:- कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता, गट-क या संवर्गातील कर्मचाऱ्यांना तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत (१०-२०-३० वर्षे) प्रथम/ द्वितीय/ तृतीय लाभ मंजूर करणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश क्र. साबां/आस्था-२/४०७/२०२६
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग
अहिल्यानगर, दिनांक : स्वाक्षरीखाली नमूद केले प्रमाणे

वाचा-
१. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५, दिनांक ०८/०६/१९९५.
२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २०/०७/२००१.
३. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-२०००/प्र.क्र.१०/सेवा-३, दिनांक ०३/०८/२००१.
४. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दिनांक ०१/०४/२०१०.
५. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दिनांक ०२/०३/२०१९.
६. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट याचिका क्र. ८००९/२०२१ मधील निर्णय, दिनांक ०२/०८/२०२२.
७. मा. अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. न्यायप्र-२०२१/प्र.क्र.१३१/ आस्था-४, दिनांक ११/१०/२०२३.
८. गठित समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त, दिनांक -१०/०७/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये सादर करणेत येते की,संदर्भ क्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये, सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे-बँड रु. १५,६००-३९,१०० व ग्रेड पे रु. ५,४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अटी व शर्ती तसेच गठित समितीने मान्य केलेल्या प्रस्तावाचा विचार करून, उपरोक्त शासन निर्णयांमधील तरतुदीनुसार कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता, गट-क या संवर्गातील खाली नमूद कर्मचाऱ्यांना त्यांच्या नियमित सेवेची १०, २० व ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय लाभ पदोन्नती साखळीतील समकक्ष पदाच्या वेतनस्तरात मंजूर करण्यात येत आहे.

सदर लाभ वेतन मॅट्रिक्समधील स्तंभ क्र. ७ मध्ये दर्शविलेल्या वेतनस्तरानुसार, संबंधित कर्मचाऱ्यांच्या नावासमोर नमूद केल्याप्रमाणे, खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | तालुका | कर्मचारी नांव | प्रथम नियुक्तीने हजर दिनांक | | | संपूर्ण सेवाकालावधी मध्ये एकूण पदोन्नतीचा दिनांक व पदनाम | 10 वर्षाच्या सेवेनंतर पहिला लाभ अनुज्ञेय दिनांक | | | पहिला लाभासाठी पात्र दिनांक व वेतनश्रेणी | 20वर्षाच्या सेवेनंतर दुसरा लाभ अनुज्ञेय दिनांक | | | दुसरा लाभ दिलेल्या पदाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | | ५ | ६ | | | ७ | ८ | | | ९ |
| १ | जि.प.सा.बा. उप विभाग अकोले | श्री. कपिल नरहरीसा गऊळ | १ | १ | २०१० | कनिष्ठ अभियंता दि - १५/४/२०१५ | १५ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस-२०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| २ | जि.प.सा.बा. उप विभाग कर्जत | श्रीम. जगताप संजीवनी शामराव | २९ | १२ | २०११ | कनिष्ठ अभियंता १६-०४-२०१५ | १६ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस-२०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| ३ | जि.प.सा.बा. उप विभाग अकोले | श्री. सुनिल शिवाजी साळुंके | १३ | ५ | १९९९ | नाही | १३ | ५ | २०११ | उप अभियंता पदाचा पहिला १५६००-३९१०० ग्रेड पे-५४०० | १३ | ५ | २०१९ | (Pay Matrix Level S-२३ : ६७७००- २०८७००) कार्यकारी अभियंता पदाचा दुसरा लाभास पात्र |
| ४ | जि.प.सा.बा. उपविभाग नेवासा | श्री. सुशिल धोंडीराम माळवे | ४ | १ | २०१२ | कनिष्ठ अभियंता दि.१५/०४/ २०१५ | १५ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस-२०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| ५ | जि.प.सा.बा. उपविभाग अकोले | सचिन बाळकृष्ण सांगळे | १ | १ | २०१० | कनिष्ठ अभियंता १७-०४-२०१५ | १७ | ४ | २०२५ | उप अभियंता-एस- २०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| ६ | जि.प.सा.बा. उपविभाग कर्जत | श्री. क्षिरसागर अभिमन्यु रामदास | ३१ | १२ | २००९ | कनिष्ठ अभियंता २१-०४-२०१५ | २१ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस- २०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| ७ | जि.प.सा.बा. उप विभाग संगमनेर | श्री. दिनेश रामप्रताप बिंद | २ | ५ | २०१२ | कनिष्ठ अभियंता दि - ०१/०९/२०१५ | १ | ९ | २०२५ | उप अभियंता- एस- २०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| ८ | जि.प.सा.बा. उप विभाग संगमनेर | श्री. कांबळे विजय भास्कर | २८ | ८ | २०१२ | कनिष्ठ अभियंता दि - १६/३/२०१६ | १६ | ३ | २०२६ | उप अभियंता- एस- २०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| ९ | जि.प.सा.बा. उप विभाग कोपरगाव | श्री. अश्विन पंडीत वाघ | १ | १ | २०१० | कनिष्ठ अभियंता दि - १५/४/२०१५ | १५ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस- २०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| १० | जि.प.सा.बा. उप विभाग नेवासा | श्री. गणेश पुंजाहारी सवाई | ३ | ११ | २००८ | कनिष्ठ अभियंता दि - १५/४/२०१५ | १५ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस- २०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| ११ | जि.प.सा.बा. उप विभाग पारनेर | श्री. किरण वसंत जाधव | ३१ | १२ | २००९ | कनिष्ठ अभियंता दि - १५/०४/२०१५ | १५ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस- २०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| १२ | जि.प.सा.बा. उप विभाग शेवगाव | श्री. कोटंबे सुजित सुभाषराव | १ | १ | २०१० | कनिष्ठ अभियंता -१५/०४/२०१५ | १५ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस- २०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |
| १३ | जि.प.सा.बा. उप विभाग कोपरगाव | श्री. राजु ठकाजी दिघे | २४ | १० | २००८ | कनिष्ठ अभियंता दि - १५/४/२०१५ | १५ | ४ | २०२५ | उप अभियंता- एस-२०- ५६१००- १७७५०० | - | - | - | - |

अटी व शर्ती-

१) संबंधित कार्यालय प्रमुखांनी संबंधित कर्मचाऱ्यांच्या सलग सेवेचे दाखले, विभागीय/अर्हता परीक्षा, संगणक परीक्षा, स्थायित्व प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, मत्ता व दायित्व विवरणपत्र, विभागीय चौकशी तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करूनच संबंधित कर्मचाऱ्यास लाभ अनुज्ञेय असल्याची खात्री करावी व त्यानुसार सुधारित वेतननिश्चिती करावी.

२) सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू राहील. संबंधित कर्मचारी वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरित करू लागल्यानंतर या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

३) या योजनेअंतर्गत पात्र कर्मचाऱ्यास संपूर्ण सेवा कालावधीत पात्रतेनुसार जास्तीत जास्त तीन लाभ मंजूर करण्यात येतील.

४) ज्या कर्मचाऱ्यास संपूर्ण सेवा कालावधीत दोन कार्यात्मक पदोन्नती मिळालेल्या असतील, त्यास या योजनेअंतर्गत एकच लाभ अनुज्ञेय राहील. तसेच ३० वर्षांच्या नियमित व सलग सेवेत कार्यात्मक पदोन्नती व लाभांची एकूण संख्या तीनपेक्षा जास्त होणार नाही, याची खात्री संबंधित कार्यालय प्रमुखांनी करावी.

५) संपूर्ण सेवा कालावधीत तीन कार्यात्मक पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यास या योजनेअंतर्गत कोणताही लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

६) या योजनेअंतर्गत पदोन्नती साखळीतील पदाचा वेतनस्तर मंजूर करण्यात येत असल्याने संबंधित कर्मचाऱ्याने त्या पदासाठी विहित केलेल्या सर्व अर्हता व निकषांची पूर्तता केलेली असणे आवश्यक राहील.

७) यापूर्वी कालबद्ध पदोन्नती अथवा सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत प्रथम किंवा द्वितीय लाभ मंजूर झालेला असल्यास, सदर लाभ या योजनेअंतर्गत अनुक्रमे प्रथम किंवा द्वितीय लाभ म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

८) विवक्षित सेवा कालावधीनंतर संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये कोणतीही वाढ न होता अकार्यात्मक अथवा तत्सम उच्च वेतन संरचना मंजूर झाल्यास, तो लाभ या योजनेअंतर्गत प्रथम लाभ म्हणून ग्राह्य धरला जाईल.

९) ज्या कर्मचाऱ्यास प्रथम लाभ म्हणून ज्या पदाचा वेतनस्तर मंजूर करण्यात आला आहे, त्या पदास पुढील विवक्षित सेवा कालावधीनंतर अकार्यात्मक अथवा तत्सम उच्च वेतन संरचना मंजूर होत असल्यास, ती संरचना द्वितीय लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.

१०) दिनांक ०१/०१/२०१६ ते दि. ०२/०३/२०१९ या कालावधीत १२ किंवा २४ वर्षांची सेवा पूर्ण झाल्यामुळे प्रथम अथवा द्वितीय लाभ मंजूर झालेल्या कर्मचाऱ्यांचे पूर्वीचे आदेश रद्द समजून तीन लाभांच्या सुधारित योजनेनुसार प्रथम/द्वितीय/तृतीय लाभ सुधारित करून मंजूर करण्यात येतील. त्यानुसार पूर्वी दिलेली रक्कम समायोजित करून फरकाची रक्कम असल्यास ती अदा करण्यात यावी.

११) ज्या कर्मचाऱ्यांची नियमित व सलग १० वर्षांची सेवा दि. ३१/१२/२०१५ रोजी अथवा त्यापूर्वी पूर्ण झाली असेल, त्यांना पात्रतेनुसार प्रथम लाभ दि. ०१/०१/२०१६ पासून मंजूर करण्यात येईल.

१२) ज्या कर्मचाऱ्यांची २० वर्षांची नियमित सेवा दि. ०१/०१/२०१६ रोजी किंवा त्यानंतर पूर्ण होईल, त्यांना द्वितीय लाभानंतर १० वर्षांनी पदोन्नती साखळीतील पदाचा तृतीय लाभ पात्रतेनुसार अनुज्ञेय राहील.

१३) दि. ०१/०१/२०१६ पासून होणाऱ्या पदोन्नतीच्या वेळी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ मधील नियम १३ नुसार वेतननिश्चितीचा लाभ देण्यात येईल.

१४) दिनांक ०१/०१/२०१९ पूर्वी पदोन्नती साखळीतील पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१९ पासून सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रिक्सनुसार पात्रतेप्रमाणे प्रथम/ द्वितीय/तृतीय लाभ अनुज्ञेय राहील.

१५) ही योजना दि. ०१/०१/२०१६ पासून लागू असल्याने, दि. ०१/०१/२०१६ पूर्वीच सेवानिवृत्त अथवा मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तथापि, दि. ३१/१२/२०१५ पूर्वी प्रथम अथवा द्वितीय लाभ प्राप्त करून दि. ०१/०१/२०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त/मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्रतेप्रमाणे द्वितीय अथवा तृतीय लाभ अनुज्ञेय राहील.

१६) या योजनेअंतर्गत लाभ मंजूर करताना गोपनीय अहवालांच्या सरासरी प्रतवारीचा निकष सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयानुसार लागू राहील.

१७) कार्यात्मक पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यास भविष्यात पदोन्नती मिळाल्यानंतर त्या पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षांची नियमित सेवा पूर्ण झाल्यानंतर, विहित अटी व शर्तींची पूर्तता केल्यास लाभ अनुज्ञेय राहील.

१८) मागास प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मंजूर करताना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१९) या योजनेअंतर्गत लाभ मंजूर झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष पदोन्नती नाकारल्यास किंवा पदोन्नतीस अपात्र ठरल्यास मंजूर लाभ रद्द करण्यात येईल. तथापि, त्याची वसुली करण्यात येणार नाही. अशा परिस्थितीत वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ नुसार करण्यात यावी.

२०) रोजंदारी, कार्यव्ययी आस्थापना, कंत्राटी व तदर्थ नियुक्त कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

२१) संबंधित कर्मचाऱ्याने लहान कुटुंबाच्या निकषानुसार दोनपेक्षा अधिक अपत्ये नसल्याची खात्री संबंधित कार्यालय प्रमुखांनी करावी. अन्यथा संबंधित कर्मचारी या योजनेस अपात्र राहील.

२२) भविष्यात शासन निर्णय, लेखापरीक्षण किंवा इतर कारणांमुळे वेतनाचे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याची वसुली करण्यात येईल. यासाठी संबंधित कर्मचाऱ्याकडून विहित नमुन्यात बंधपत्र (Undertaking) घेऊनच वेतननिश्चिती करावी.

२३) संबंधित कर्मचाऱ्याकडून विहित नमुन्यात करारनामा/बंधपत्र करून घेण्यात यावा.

२४) सदर आदेशाची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांच्या मूळ सेवा पुस्तकात घेऊन आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करावी.

सदर आदेश जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र-202608181300३३ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-08-2026 22:37:01
आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

वरील रकाणा क्र.३ मध्ये नमुद केलेले १ ते १३ कनिष्ठ अभियंता
२/-व्दारा-संबधीत उप अभियंता जि.प.सा.बा.उपविभाग-अकोले/कर्जत/नेवासा/ संगमनेर/ कोपरगाव / शेवगाव / पारनेर

प्रत :

१. मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, अहिल्यानगर.
२. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर.
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर/दक्षिण) विभाग, जिल्हा परिषद, अहिल्यानगर
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अकोले/कर्जत/नेवासा/ संगमनेर/ कोपरगाव /शेवगाव/ पारनेर
५. उपअभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अकोले/कर्जत/नेवासा/ संगमनेर/ कोपरगाव /शेवगाव/ पारनेर